दिनांक : 01/03/2019

# ' मराठी भाषा दिवस वृत्तांत '

कुसुमाग्रजांचा जन्मदिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून उत्साहात साजरा करायचे ज्ञानपीठ विजेते जेष्ठ मराठी साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांचा जन्म 27 फेब्रुवारी 1912 मध्ये झाला होता. त्यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून 27 तारखेला 'जागतिक मराठी भाषा दिन' साजरा केला जातो.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज बुधवार 27 फेब्रुवारी रोजी 'ठाकूर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय' मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आजचा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणजे तमाम मराठी माणसांना अभिमान वाटावा असा दिवस या निमित्ताने आयोजित कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मायबोली विषयी आपली मते मांडली. आपले विचार मांडण्याचे एक उत्तम व्यासपीठ 'ठाकूर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय' ने देऊ केले. मराठी विषयीचे प्रेम जागृत करायचे असेल आणि मराठी भाषेची स्थिती सुधारायाची असेल तर प्रत्येकाने प्रथम सुरुवात आपल्यापासून करायला हवी असे प्राध्यापकांनी आवर्जुन सांगितले. सर्व प्रकारच्या कामकाजामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त उपयोग व्हायला हवा, तरच भाषेच्या कक्षा रुंदावून ती अधिक व्यापक होईल असे मत देखील सर्वांनी मांडले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्राध्यापिका पूर्वा वायंगणकर यांनी केले.

- मराठी दिवसाच्या कार्यक्रमाचा आरंभ प्राध्यापिका पूर्वा वायंगणकर यांच्या प्रास्ताविक भाषण आणि कविता वाचनाने झाले.
- प्राध्यापक विशाल तेंडूलकर यांनी 'मराठी भाषा' विषयीचे मनोगत व्यक्त केले आणि कुसुमाग्रजांच्या आणि संदिप खरे यांच्या कविता सादर केल्या.
- प्राध्यापक ईला आगरकर, तुकाराम पाटील, विनय भाटकर, योगेश भालेकर आणि भीम कुंटे यांच्या सुंदर कवितांच्या सादरीकरणाने सगळयाचें मन भारावून गेले.

- सहायक ग्रंथपाल सोमनाथ चिंचकर यांनी मराठीतील प्रसिध्द गीतांचे सादरीकरण केले.
- प्राध्यापिका अन्विता बिर्जे यांनी 'भाषेतील अलंकार' या विषयी मनोरंजक माहिती सांगितली. यातून मराठी भाषेचे वैशिष्ट्य ठळकपणे अधोरेखित केले गेले.
- प्राध्यापक विनितकुमार डोंगरे यांनी व-हाडी भाषेतील कविता सादर केली. तसेच प्राध्यापक संजीव चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.
- प्राध्यापक निवांत कांबळे, संजय पाटिल आणि पंकज राऊळ यांनी काही विनोदी कथा आणि कविता सादर केल्या.

अशा प्रकारे वेगवेगळया मनोरंजक सादरीकरणानें कार्यक्रमाला रंगत आणली. सर्वात शेवटी प्राध्यापिका पूर्वा वायंगणकर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



